



# रक्तदान शिबीर कसे आयोजीत करावे ?



(मार्गदर्शक पुस्तीका)



# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| स्वेच्छिक रक्तदान मोहीम | ३ |
| रक्तपेढी निवडणे | ४ |
| रक्तपेढी बरोबर संपर्क साधणे | ५ |
| ठिकाण निवडणे | ६ |
| संभाव्य दात्यांना प्रेरणा देणे | ७ - ८ |
| पोस्टर्स / बॅनर्स | ९ - १० |
| आराखड्याची आखणी करणे | ११ |
| कार्यक्रमाच्या ठिकाणी व्यवस्था | १२ |
| आराखडा आखणे | १३ |
| रक्तदात्याची काळजी | १४ |

सुरक्षित रक्त आणि त्याचे घटक ज्यांना गरज आहे अशा व्यक्तींना उपलब्ध करून देणे हे कोणत्याही रक्ताविषयीच्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट असते. गोळा करण्यात आलेले रक्त सुरक्षित आहे ह्याची काळजी घेणे महत्त्वाचे असते. दुसऱ्या शब्दात ते सर्व रक्त चढविणे, रक्ताद्वारे संक्रमित होणारे रोग (टीटीडीज) ह्यापासून मुक्त असावे.

सर्व रक्तपेढ्यांमध्ये सर्व टीटीडीजसाठी रक्ताची चाचणी केली जाते, सुरक्षित रक्तदात्याकडून रक्त घेणे हे देखिल अतिशय आवश्यक असते. आज, भारतात आणि परदेशात सांख्यिकी दृष्टिकोनातून हे प्रस्थापित करण्यात आले आहे की सुरक्षित रक्तदाता ही अशी व्यक्ती असते जी स्वेच्छेने रक्तदान करते, व तिला त्याचा लाभ कोण घेत आहे हे माहित नसते, त्याच्या कोणत्याही अपेक्षा नसतात, आणि त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव नसतो.

रक्तदान मोहीमेच्या वेळी स्वेच्छिक रक्तदात्याकडून गोळा केलेले रक्त हे रक्ताचा अतिशय सहज सुरक्षित आणि सर्वोत्कृष्ट स्रोत असतो. स्वेच्छिक रक्तदाते अस्तित्वात असतात. रक्तपेढ्यांनी ज्याठिकाणी रक्तदाते असतात तेथे जाण्याची गरज असते. जर रक्तदात्याला रक्तदानाची माहिती देण्यात आली आणि जर रक्तदान सोयिस्कर प्रकारे आयोजित करण्यात आले तर रक्तदाते पुढे येऊन स्वेच्छेने रक्तदान करतील. स्वेच्छिक रक्तदान मोहीमांचे आयोजन कोणत्या ठिकाणी करावे हे निश्चित करणे महत्त्वाचे असते.

ज्या भागात रक्तदान मोहीमांचे आयोजन करता येऊ शकते अशी ठिकाणे आहेत:

१. महाविद्यालये

२. कार्यालये

३. कारखाने/औद्योगिक वसाहती

४. निवासी सोसायट्या

५. धार्मिक संस्था/एकत्र जमण्याची ठिकाणे

६. सामाजिक संस्था

७. मित्र मंडळे/क्लब्स

८. मॉल्स

९. सार्वजनिक ठिकाणे

त्यामुळे रक्तदान शिबीरांचे आयोजन करणाऱ्या व्यक्ती सुरक्षित रक्त उपलब्ध होईल ह्यासाठी महत्त्वाच्या घटक असतात.

# रक्तपेढी निवडणे

बहुतेक रक्तदान मोहीमांच्या आयोजकांच्या यादीत ठराविक रक्तपेढ्यांची यादी केलेली असते. अशा परिस्थितीत रक्तपेढीची निवड करणे ही फार मोठी बाब नसते. परंतु, जेव्हा निवड करायची असते किंवा तुम्हाला एकाहून अधिक रक्तपेढ्यांची निवड करायची असते तेव्हा खालील गोष्टींचा विचार करावा:

## भौगोलिक अंतर

भौगोलिक बाबतीत सर्वात जवळ असलेल्या रक्तपेढीची तुम्ही निवड करू शकता. हा खूप महत्त्वाचा घटक नाही. परंतु, जवळच्या रक्तपेढीशी संबंध असणे ही तुमच्या अगदी जवळच्या शेजाऱ्यांच्या बाबतीत तुम्हाला असलेली आत्मियता दर्शविते.

## शिबिरापाशी अपेक्षित रक्तदात्यांची संख्या

जर अपेक्षित रक्तसंचय १०० युनिटसहून अधिक असेल, तर तुम्ही कोणत्याही रक्तपेढीला बोलावू शकता. जर अपेक्षित संचय १०० हून खूप अधिक किंवा ४० हून कमी असेल तर शिबीराचा आकार महत्त्वाचा असेल.

अ) लहान शिबिरांसाठी (५० युनिटसहून कमी) अशा रक्तपेढ्यांना बोलाविणे योग्य ठरेल ज्यांच्यासाठी अपेक्षित संचय हा रक्तपेढीच्या २० दिवसांच्या गरजेहून अधिक होत नसेल.

ब) मध्यम आकाराच्या शिबीरासाठी (५० ते ४०० युनिटस) अशा रक्तपेढ्यांना बोलाविणे योग्य ठरेल ज्यांच्यासाठी अपेक्षित संचय हा रक्तपेढीच्या १५ दिवसांच्या गरजेहून अधिक होत नसेल.

क) खूप मोठ्या शिबीरांसाठी (४०० युनिटसहून अधिक) एकाहून अधिक रक्तपेढ्यांना बोलाविण्याचा सल्ला देण्यात येत आहे. बोलाविण्यात आलेल्या प्रत्येक रक्तपेढीला १५ दिवसांच्या गरजेहून अधिक रक्त देणे उचित नाही.

## रक्तपेढीतील साठ्याची स्थिती

रक्तपेढी निवडताना साठ्याची स्थिती हा खूप महत्त्वाचा घटक असला पाहिजे. मध्यम किंवा मोठ्या आकाराच्या शिबीरांच्या वेळी, विविध रक्तपेढ्यांमधील रक्ताची परिस्थिती तपासून पाहणे योग्य ठरेल. ज्या रक्तपेढीला रक्ताची तातडीची गरज आहे अशा रक्तपेढीला प्रथम प्राधान्य दिले पाहिजे.

## रक्तपेढीबरोबरचे संबंध

पहिल्या काही शिबिरांनंतर, रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता व वर्तनानुसार संयोजक रक्तपेढीशी संबंध कमी करतात किंवा वाढवतात असा आमचा अनुभव आहे.

सोबत जोडलेल्या परिशिष्टात महाराष्ट्रातील सर्व रक्तपेढ्यांची यादी, त्यांचा संपर्क, ह्यांचा तपशिल देण्यात आला आहे.

रक्तपेढीबद्दल निर्णय घेण्यात आल्यानंतर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याची तुमची इच्छा असल्याची माहिती रक्तपेढीला लेखी स्वरूपात कळविण्याची गरज असते. तोंडी किंवा लेखी असे सर्व संपर्क ''मेडिकल सोशल वर्कर'' किंवा ''रक्तपेढी प्रमुख'' ह्यांच्याशी करावे. तुम्ही लिहावे अशा पत्राचा नमुना खाली देण्यात आला आहे:

(संस्थेचे नाव - Letter Head)

दिदि.मम.वववव

मेडिकल सोशल वर्कर (वैधकिय सामाजिक कार्यकर्ता)
............... रक्तपेढी,
............... रूग्णालय

महोदय,
विषय: दि.................रोजी रक्तदान शिबीर

आपणास ह्याची खात्री देण्यात येत आहे की दि................. रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे, ज्याचा तपशील खाली देण्यात आला आहे:

दिनांक : ......................

वेळ : सकाळी/सायंकाळी ......... ते सकाळी/सायंकाळी ..............

पत्ता : ..........................................................................
..........................................................................

महत्त्वाची खूण : ............................

अपेक्षित रक्तसंचय :.......................

आपल्या संपूर्ण चमु समवेत............. सकाळी/सायंकाळी वाजता येण्याची आम्ही आपणास विनंती करत आहोत. शिबीराची सुरवात ..............सकाळी/सायंकाळी वाजता करता येईल. आपण खाटा, आणि कॉफी व बिस्किटस ह्याची व्यवस्था कराल अशी आम्हाला आशा आहे. आमच्याकडून काही मदतीची मदतीची अपेक्षा असल्यास कृपया आम्हाला तसे कळवा. आम्ही त्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करू.

धन्यवाद,

आपला विश्वासू,

सही...................

नांव ( )

# ठिकाण निवडणे

शिबीराचे ठिकाण एखाद्या शाळेतील वर्ग, सामाजिक सभागृह, निवासी सोसायटीच्या कार्यालयाची जागा, इमारतीतील स्टिल्टची जागा, कार्यालयातील सभागृह, कार्यालयातील कोणत्याही तीन खोल्या वगैरे.

ठिकाण निवडताना खालील गोष्टी महत्त्वाच्या असतात:

१. संभाव्य रक्तदात्याला जागा जवळ असणे
हा खूप महत्त्वाचा घटक आहे. जे रक्तदाते कुंपणावर बसणारे असतात ते रक्तदान न करण्याची शक्यता असते आणि ठिकाण खूप दूर असल्याचे कारण सांगुन रक्तदान करणे टाळतात.

२. ठिकाणाचे प्रत्यक्ष आकारमान
रक्तदान शिबीराला पुरेल इतके मोठे ठिकाण असावे. रक्तदान शिबीराच्या अपेक्षित रक्त संकलनानुसार, अर्ज भरणे, नोंदणी, खाटांच्या संख्येनुसार लागणारी जागा, नाश्ता व रक्तदानानंतर विश्रांतीसाठी लागणारी जागा, अशा सर्व बाबींवर एकुण जागेची गरज अवलंबून असते.

३. सुविधांची उपलब्धता

ह्याठिकाणी खालील सुविधा उपलब्ध असाव्यात:

१. उजेडाची व्यवस्था
२. वायुविजन
३. पंखे/कूलर्स
४. पिण्याचे पाणी
५. टेबले आणि खुर्च्या

★ कृपया मंडपात रक्तदान शिबीर आयोजित करणे टाळावे.

★ इमारत असल्यास तळमजल्यावरील ठिकाण निवडण्यास प्राधान्य द्यावे.

सर्व संभाव्य रक्तदात्यांना परिणामकारकतेने माहिती कळविणे आणि शिबीरामध्ये त्यांना रक्तदान करण्यासाठी घेऊन येणे, हे आयोजकांचे सर्वात महत्त्वाचे काम असते. ह्यासाठी व्यक्तिगत लक्ष देण्याची आणि आयोजकांच्या तुकडीत जास्तीत जास्त लोकांना सहभागी करण्याची गरज असते.

संभाव्य रक्तदात्यांशी संपर्क साधण्याच्या विविध माध्यमांची माहिती खाली देण्यात आली आहे. तुमच्या येथील परिस्थितीला जे लागू असेल त्यानुसार तुम्ही त्यापैकी काहींचा किंवा सर्वांचा उपयोग करू शकता.

### माहितीपुस्तिका

खासकरून निवासी भागात शिबीराचे आयोजन करताना हे लागू असते. ह्या माहितीपत्रकात रक्तदान शिबीराचे आयोजन का, कोठे आणि कधी करण्यात येत आहे ह्याची माहिती असावी. ह्या माहितीपुस्तिका शिबीराच्या ३ ते ४ दिवस अगोदर वाटणे योग्य ठरते. माहितीपुस्तिकांची नमुना प्रत परिशिष्टात दिली आहे. तुम्ही एकतर ती तशीच छापू शकता किंवा तुमच्या स्वत:च्या आवडीनुसार त्यात सुधारणा करू शकता किंवा नविन आरेखन करू शकता.

### वर्तमानपत्रासाठी - प्रसिध्दी पत्रक

मोठ्या जनसमुदायाला माहिती कळविण्याचा हा सोपा मार्ग आहे. ह्यामुळे संभाव्य रक्तदात्याला माहिती कळविण्याचे उद्दिष्ट साध्य होते इतकेच नव्हे तर त्यामुळे आयोजक समितीला प्रेरणा मिळते. विविध वर्तमानपत्रांच्या ''चीफ रिपोर्टरला" अगदी साधा प्रसिध्दी पत्रक पाठविणे इतकेच ह्यासाठी आवश्यक असते. सोबतच्या परिशिष्टात तुमच्यासाठी नमुना प्रसिध्दी पत्रक देण्यात आला आहे. शिबीराच्या ३-४ दिवस अगोदर संबंधित वर्तमानपत्रांना प्रसिध्दी पत्रक पाठविण्यात यावे.

### टीव्हीवर माहितीची पट्टी

रक्तदान मोहीमेची घोषणा करणारी माहितीची पट्टी दाखविण्याची विनंती स्थानिक केबल चॅनलला करता येऊ शकेल. सोबतच्या परिशिष्टात त्याची 'विनंती करणाऱ्या पत्राचा' नमुना देण्यात आला आहे. शिबीराच्या २ ते ३ दिवस अगोदर आणि शिबीराच्या दिवशी अशा प्रकारची पट्टी दाखविण्याची विनंती केबल चॅनल्सना करता येऊ शकेल.

### भित्तीपत्रके

रक्तपेढ्यांकडे नेहमीची भित्तीपत्रके उपलब्ध असतात, आणि आयोजकांना ती पाठविण्याची विनंती करता येऊ शकेल. शिबीराच्या एक आठवडा अगोदर ती महत्त्वाच्या ठिकाणी लावता येऊ शकेल.

### कापडी फलक

महत्त्वाच्या ठिकाणी शिबीराची घोषणा करणारे कापडी फलक लावता येऊ शकतील. शिबीराच्या एक आठवडा अगोदर कापडी फलक लावता येऊ शकतील.

### व्याख्याने

व्याख्याने हे संभाव्य दात्यांना येऊन रक्तदान करण्यासाठी माहिती कळविणारे आणि पटवून देणारे सर्वात परिणामकारक माध्यम आहे. व्यक्तिगत विनंती अतिशय महत्त्वाची असते आणि त्यामुळे नियोजित समुहाचे थेट लक्ष वेधून घेतले जाण्याचा फायदा त्यात असतो. लोकांना व्याख्यानाला उपस्थित रहायला लावणे हे खूप कठिण काम असते. श्रद्धेची ठिकाणे, क्लबस, आणि ज्याठिकाणी लोक साधारणपणे जमा होतात अशी इतर ठिकाणे ही व्याख्याने आयोजित करण्यासाठी योग्य ठिकाणे असतात. रक्तपेढी अधिकारी अथवा वैधकिय सामाजिक कार्यकत्याला व्याख्यानाची विनंती करावी.

### व्यक्तिश:

निवासी भागात प्रत्येक घरोघरी फिरणे आणि कार्यालयीन भागात व्यक्तिश: भेट घेणे ही सर्वात परिणामकारक आणि परिश्रमपूर्ण पद्धती आहे. ह्यासाठी मोठ्या संख्येने ध्येयाने प्रेरित स्वयंसेवकांची गरज असते. घरोघरी जाणाऱ्या संघाबरोबर नियोजित समुहाला परिचित असलेली व्यक्ती त्या संघाबरोबर असावी.

### स्क्रिनसेवर/डेस्कटॉप

कार्यालयातील सर्व संगणकांवर रक्तदानाबद्दल संदेश देणारा स्क्रिन सेवर शिबीराच्या आदल्या दिवशी आणि त्यादिवशी लावता येऊ शकेल. खासकरून हा स्क्रिनसेवर मुख्यअधिकारी (चीफ एक्झिक्युटिव) यांचे द्वारा देण्यात आलेला अगदी साधा संदेश असावा.

सार्वजनिक उद्घोषणा व्यवस्था: ह्याचा शिबीराच्या दिवशी शिबीराची माहिती देण्यासाठी दर ३ तासांनी उपयोग करता येऊ शकेल. ई-मेलद्वारा संदेश प्रसारित करून देखिल असे करता येऊ शकेल.

### खाते प्रमुख

खाते प्रमुखांना त्यांच्या खात्यातील कर्मचाऱ्यांशी चर्चा करण्यास सांगावे.

### कृति समीती

कृति समीती नियुक्ती करावी आणि शिबीर यशस्वी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवावी. कृति समीतीने जास्तीत जास्त लोकांपर्यंत व्यक्तिगत पातळीवर पोहोचण्याचे काम करावे. तोंडी प्रसिद्धी खास करून शिबीराच्या दिवशी अतिशय महत्त्वाची असते.


### स्वयंसेवकांसाठी उद्दिष्ट


व्यवस्थापन समितीने त्यांच्या स्वत:साठी उद्दिष्ट निश्चित करावे. प्रत्येक व्यवस्थापन समिती सदस्य किंवा कार्यालयातील खाते प्रमुख ह्यांना निश्चित संख्येने रक्तदाते मिळतील ह्याची खात्री देण्यास सांगावे.


### कर्मचाऱ्यांना परिपत्रक


कार्यालयाच्या भागातील शिबीरासाठी, सर्व कर्मचाऱ्यांना रक्तदान शिबिराची माहिती देणारे परिपत्रक पाठवावे. ह्यामुळे माहितीपुस्तिका पाठवावी लागणार नाहीत, जे आम्ही निवासी भागात देण्याचा सल्ला दिला आहे.


# भित्तीपत्रके



रणभूमीवर जाऊन देशासाठी रक्त सांडणे प्रत्येकाला शक्य नाही.
तेवढेच पुण्यकर्म सहज शक्य आहे - रक्तदानाने
आपण वर्षातून चार वेळा रक्तदान करू शकता.
SBTC
रक्तदान करा जीवन वाचवा


पूजाला आयुष्यभर दर १५ दिवसांनी रक्त घ्यावे लागते. ती थॅलसिमिया मेजर आहे.
तुम्ही तिच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकता.
SBTC
THINK
रक्तदान करा जीवन वाचवा



रक्ताची निर्मिती कारखान्यात किंवा प्रयोगशाळेत होत नाही.
प्राण्यांचे रक्त माणसांना देता येत नाही.
रक्त तयार होते, ते फक्त एकाच ठिकाणी.
- मानवी शरीर.
SBTC
THINK
रक्तदान करा जीवन वाचवा


आपल्या शरीरात ४ ते ५ लिटर रक्ताचा साठा असतो.
खरं तर हा साठा आपल्या गरजेपेक्षा जास्तच असतो.
३५० मि. लि. रक्त दान केल्याने तुम्हाला काहीही फरक पडणार नाही.
SBTC
THINK
रक्तदान करा जीवन वाचवा


रक्तदान करणे फारच सुलभ आहे. त्यासाठी केवळ १० मिनिटे लागतात.
दान केलेले रक्त थोड्याच वेळात शरीरात आपोआप निर्माण होते.
तुमची फक्त १० मिनिटे दुसऱ्यासाठी जीवनच आहे.
SBTC
THINK
रक्तदान करा जीवन वाचवा




बॅनर




बॅनर




बॅनर




बॅनर

## रक्तदान शिबीराची तीन भागांमध्ये विभागणी करता येऊ शकते:

### रक्तदान पूर्व विभाग

ह्या भागात दान करणारी व्यक्ती प्रपत्र भरेल, व त्यानंतर वजन, हिमोग्लोबिन, रक्तदाब, वैद्यकीय इतिहास ह्यांची तपासणी केली जाईल.

### रक्तदान विभाग

ह्या भागात खाटांची व्यवस्था केली जाईल, जेथे रक्तदान करताना दान करणारी व्यक्ती राहिल. खाटांची एकुण संख्या अपेक्षित रक्तसंकलन किंवा रक्तसंचय आणि शिबीराचा कालावधी ह्यावर अवलंबून असेल. एका खाटेवर एका रक्तदात्याला त्याचे रक्तदान करण्यासाठी सुमारे १० ते १२ मिनिटांचा कालावधी लागेल. त्यामुळे एका खाटेवर एका तासात रक्तदान करणाऱ्या व्यक्तींची एकुण संख्या ५ इतकी असेल. पाच गुणीले शिबीराचा तासांमधील एकुण कालावधी अशा प्रकारे एका खाटेवर एकुण किती रक्तदान करू शकतील हे निश्चित होईल. अशा प्रकारे अपेक्षित रक्तसंचयाची खाटांची संख्या ठरविण्यासाठी मदत होऊ शकेल.

$$\text{खाटांची एकुण संख्या:} \quad \frac{\text{अपेक्षित रक्तसंचय}}{\text{५ गुणिले शिबिराचा कालावधी तासांमध्ये}}$$

ह्या भागात रक्ताचे नमुने घेण्यासाठी व टेस्ट ट्यूब्स (परिक्षानळी) ठेवण्यासाठी टेबल असवे.

### रक्तदान पश्चातचा विभाग

रक्तदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रक्तदान करणाऱ्या व्यक्तीला ह्या भागात नेले जाईल. रक्तदात्यांना ह्याठिकाणी कॉफी आणि बिस्किटे दिली जातील. रक्तदानाची कार्डस आणि इतर प्रशस्तीपत्रक वगैरे ह्याठिकाणी रक्तदात्याला दिले जाईल.

### खालील गोष्टींची काळजी घेण्यासाठी स्वयंसेवक उपस्थित असणे अतिशय महत्त्वाचे आहे:

१. रक्तदात्यावर काळजीपूर्वक देखरेख ठेवणे

२. रक्तदात्याचे त्याच्या कृत्यासाठी आभार मानणे

३. रक्तदात्याला कॉफी आणि बिस्किटे किंवा इतर काही नाश्ता देणे

४. रक्तदात्याला रक्तदानाचे कार्ड आणि इतर प्रशस्तीपत्रक देणे

५. रक्तदात्याची माहिती नोंदविणे

ह्या भागात रक्तदात्यांना बसण्यासाठी खुर्च्या पुरवाव्यात, स्टूल पुरवू नये व पाठ नसलेल्या खुर्च्या नसाव्यात. ह्या भागात पंख्यांची सुविधा असावी. पाण्याची व्यवस्था करावी (थंड आणि सामान्य तापमानातील अशा दोन्ही प्रकारच्या).

गृहित: १०० युनिट रक्तसंचय

### रक्तदान पूर्व विभाग

१. पिण्याच्या पाण्याची सुविधा

२. रक्तदान प्रपत्र भरण्यासाठी एक टेबल

३. रक्तदात्यांना प्रपत्र भरण्यासाठी सहा खुर्च्या

४. प्रपत्र भरण्यासाठी पेन

५. नोंदणी विभागासाठी तीन टेबल

६. नोंदणी विभागासाठी सहा खुर्च्या

### रक्तदान विभाग

७. रक्तदान विभागात टेस्ट ट्यूब्स आणि इतर उपकरणांसाठी दोन टेबल

८. गोळा करण्यात आलेल्या रक्ताच्या युनिटसच्या साठवणी बॉक्ससाठी बर्फ. हा साधारणपणे रक्तपेढ्या आणतात. (रक्त पिशवी व बर्फ यांचा थेट संपर्क येणार नाही याची काळजी घ्यावी.)

### रक्तदान पश्चात विभाग

९. कॉफीची किटली आणि बिस्किटांसाठी एक टेबल

१०. रक्तदात्यांना बिस्किटे आणि कॉफी देण्यासाठी दोन टेबल

११. दहा खुर्च्या

१२. ज्यांना अस्वस्थ वाटत आहे अशांसाठी एक खाट

१३. नाश्ता विभागात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

१४. प्रमाणपत्र, बॅचेस आणि आभाराचे कार्ड देण्यासाठी एक टेबल

### सर्वसाधारण

१५. दोन कचऱ्याचे डबे (इतर कचऱ्याचे डबे रक्तपेढ्या आणतात).

१६. रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांना आल्यावर नाश्ता आणि दुपारी जेवण व्यवस्था असावी तथापी हे बंधनकारक नाही.

### प्रवेशद्वारापाशी फलक

ए. मोहीमेची घोषणा करणारा


बी. रक्ताबद्दल वस्तूस्थिती

सी. रक्तदान करण्यापुर्वी करण्याच्या आणि न करण्याच्या गोष्टी

डी. अवलंबण्याची पद्धती

ई. रक्तदानानंतर करण्याच्या आणि न करण्याच्या गोष्टी

# आराखड्याचा नकाशा




| | |
|---|---|
| T1 | रक्तदात्यांना त्यांचे प्रपत्र भरण्यासाठी |
| T2 | हिमोग्लोबिन /इतर तपासण्या |
| T3 | रक्ताची बॅग स्वाधिन करण्यासाठी |
| T4 | रक्तदात्याच्या खाटेजवळ रक्ताचा  नमुना घेण्यासाठी |
| T5 | कॉफीची किटली आणि बिस्किटांची पाकिटे ठेवण्यासाठी |
| T6, T7 | नाश्ता देण्यासाठी |
| T8 | प्रमाणपत्रे वगैरे लिहिण्यासाठी |
| C1 to C8 | रक्तदात्याच्या खाटा |

## रक्तदात्याला अस्वस्थ वाटले तर तुम्ही काय करावे ?

- काही त्रास होऊ लागल्यास तात्काळ, शिबीरातील डॉक्टरांना बोलाविण्यासाठी कोणाला तरी पाठवा, व सल्ला घ्यावा.

## रक्तदात्याला पोचपावती देणे

एकदा रक्तदात्याने रक्तदानाची प्रक्रिया पूर्ण केली की (बिस्किटे व कॉफी घेण्यासह), त्याने केलेल्या उदात्त कार्याबद्दल त्याची पोचपावती देणे महत्त्वाचे असते.

खालील गोष्टी करण्याची गरज असते:

१. रक्तदात्याचे व्यक्तिश: आभार माना. आयोजक संघापैकी जबाबदार व्यक्तीने हे करण्याची गरज असते.

२. रक्तदात्याला त्याचे रक्तदानाचे कार्ड द्या. रक्तदात्याचे कार्ड रक्तपेढीमार्फत दिले जाते.

३. रक्तदात्याला प्रमाणपत्र/बॅचेस/आभाराचे कार्ड द्या.

४. रक्तदात्याला त्याचे पुढील रक्तदान ३ महिन्यांनंतर करता येऊ शकेल ह्याची आठवण करून द्या.


५. रक्तदात्यांचे जन्मदिवस रजिस्टर तयार करा., यामुळे रक्तदात्यांना त्यांच्या जन्मदिवशी/वाढदिवशी अभिनंदन करता येईल.

**आयोजकांनी पुढच्या रक्तदान शिबीराची तारीख देण्यास विसरु नये !**

# सुरक्षित रक्ताची सुरवात माझ्यापासुन



## रक्तदान करा जीवन वाचवा



द्वारा प्रकाशित

राज्य रक्त संक्रमण परिषद

५वा मजला, रविंद्र ॲनेक्स

दिनशा वाच्छा मार्ग,

चर्चगेट, मुंबई

दूरध्वनि : २२८३ ०२१६

फॅक्स : २२८५ ४९८१

संकेतस्थळ: www.mahasbtc.com

द्वारा सहाय्य

थिंक फाउंडेशन

क्रमांक १, गोल्डन बेबी,

सुंदर नगर लेन क्रमांक २,

कालिना, सांताक्रूज (पूर्व)

मुंबई ४०० ०९८

दूरध्वनि क्रमांक: ६५१८ १३४१/४३

फॅक्स क्रमांक: २६६६ ०८९९

संकेतस्थळ: www.thinkfoundation.org

Klassic - 98210 55882